# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक)

कार्यकारी अभियंता (सी-३ विभाग) कार्यालय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, १०, रोपालेन, चंदनवाडी, मरीन लाईन्स (पुर्व), मुंबई-४०० ००२.

ई मेल: rreec3mhada@gmail.com

## ई-निविदा सुचना

कार्यकारी अभियंता (सी-३ विभाग) कार्यालय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, १०, रोपालेन, चंदनवाडी, मरीन लाईन्स (पुर्व), मुंबई-४०० ००२ या कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या कामाकरीता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे उप जिल्हानिबंधक / मुंबई जिल्हा (शहर) यांचेकडे नोंदणीकृत **मजुर सहकारी संस्था / सोसायटी** कडून योग्य त्या प्रणालीसाठी ऑनलाईन ई निविदा मागविण्यात येत आहेत.

| अनु. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम (रुपये) | इसार रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम (रुपये) (५० टक्के प्रथम व ५० टक्के देयकातून) | निविदा शुल्क (१८%जीएसटी ) | काम पुर्ण करण्याचा कालावधी (पावसाळ्या सहीत) | ठेकेदारांची मजुर सहकारी संस्था नोंदणी वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | विशेष दुरुस्ती अंतर्गत पुनर्रचित इमारत "अंबिका सदन" १६-२६ संत सेना महाराज मार्ग, मुंबई, सी-३ विभाग (अंतर्गत व बाह्य प्लास्टरची दुरुस्ती) | रु.१५,३५,२९२/- | Nil | रु.१६,०००/- | रु.५९०/- | १८ महिने (मान्सूनसह) | वर्ग -ब आणि त्यावरील |
| २. | विशेष दुरुस्ती अंतर्गत पुनर्रचित इमारत "गणेश दर्शन" २८-४२, संत सेना महाराज मार्ग, मुंबई, सी-३ विभाग (अंतर्गत आणि बाह्य प्लास्टर व रंगकाम.) | रु.१५,१३,८०४/- | Nil | रु.१६,०००/- | रु.५९०/- | १८ महिने (मान्सूनसह) | वर्ग -ब आणि त्यावरील |
| ३. | विशेष दुरुस्ती अंतर्गत पुनर्रचित इमारत स्वामी समर्थ दर्शन, ५०-६०, संत सेना महाराज मार्ग, मुंबई, सी-३ विभाग (अंतर्गत आणि बाह्य प्लास्टर व रंगकाम.) | रु.१४,११,८०१/- | Nil | रु.१५,०००/- | रु.५९०/- | १८ महिने (मान्सूनसह) | वर्ग -ब आणि त्यावरील |
| ४. | विशेष दुरुस्ती अंतर्गत पुनर्रचित इमारत १०-१२, रोपा लेन, चंदनवाडी, मरिन लाईन (बाह्य आणि अंतर्गत प्लास्टर दुरुस्तीची कामे तसेच संबंधित कामासाठी) | रु.१२,०३,६४३/- | Nil | रु.१३,०००/- | रु.५९०/- | १८ महिने (मान्सूनसह) | वर्ग -ब आणि त्यावरील |

१. सदर निविदा २ मोहरबंद लिफाफा पध्द्तीने ऑनलाईन मागविण्यात येत आहे. तसेच सदर निविदांबाबतचा पुढील पत्रव्यवहार हा **http://mhada.maharashtra.gov.in** आणि **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळांवरच प्रसिध्द करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

२. सर्व पात्र / इच्छुक कंत्राटदारांना निविदा संबंधित दस्तऐवज वेबसाईट **http://mahatenders.gov.in** यावर पाहून डाऊनलोड / अपलोड करता येईल. (दिनांक- **२२.०७.२०२६** सकाळी **१०.०५** वाजल्यापासुन ते दिनांक- **२९.०७.२०२६** रोजी दुपारी **५.००** वाजेपर्यंत).

३. निविदा अर्जाची रक्कम आणि अनामत रक्कमेचा भरणा ऑनलाईन पध्दतीनेच करावा.

४. **तांत्रिक निविदा दिनांक-३०.०७.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता तसेच आर्थिक बोलीबाबतची निविदा शक्य झाल्यास दिनांक-३१.०७.२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता**, कार्यकारी अभियंता (सी-३ विभाग) कार्यालय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, १०, रोपालेन, चंदनवाडी, मरीन लाईन्स (पुर्व), मुंबई-४०० ००२ यांचे दालनात वेबसाईट **http://mahatenders.gov.in** वर उघडण्यात येईल.

५. तांत्रिक निविदा उघडतेवेळी कंत्राटदाराने, निविदा अपलोड करतांना सादर केलेल्या मुळ कागदपत्रांसह उपस्थित रहावे.

६. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र व ठेकेदाराचे नाव काळया यादीत समाविष्ठ नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र लागू असल्यास रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले मूळ प्रतित सादर करावे. सदर मूळ प्रतिज्ञापत्र निविदा सूचना कालावधिमधील असणे अत्यावश्यक आहे. तसेच सदर मूळ प्रतिज्ञापत्रा मध्ये निविदाकाराने स्वत:चे नाव, कंपनीचे नाव व सोबत ज्या इमारतीच्या कामाची निविदा भरणार आहे त्या इमारतीचे नाव व निविदा बोली क्रमांक नमूद करणे अत्यावश्यक आहे. सर्व निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

७. निविदाकाराने अपलोड करावयाची माहिती पीडीएफ फॉरमॅटमध्येच अपलोड करावी.

८. कंत्राटदाराकडे प्राधिकृत संस्थेकडून प्राप्त केलेले विहित नोंदणी वर्गातील डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट असणे आवश्यक आहे.

९. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्याचे अधिकार सक्षम अधिका-यांकडे ठेवण्यात येत आहे.

१०. कंत्राटदारांना जी.एस.टी. नोंदणी अनिवार्य राहिल.

११. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकार सादर करणा-यानी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम ८ दिवसांच्या आत भरली नाहीतर द्वितीय न्युनतम देकाराच्या निविदाधारकास लेखी विचारणा करुन तो जर प्रथम न्युनतम देकाराच्या दरापेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असेल तर त्याची निविदा मंजुर केली जाईल. अतिरिक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर निविदा सुचना पहावी.

१२. मागविण्यात आलेली निविदा प्रचलित एसएसआरवर आधारीत असून, त्यामध्ये जी. एस. टी. अंतर्भुत नाही. जी. एस. टी. ची अदायगी स्विकृती करारनामा मुल्यावर होईल.

१३. सविस्तर निविदा सुचना http://mhada.maharashtra.gov.in आणि **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे. निविदेसंबंधी कागदपत्रे व ऑनलाईन निविदा सादर करणेबाबत आवश्यक ते मार्गदर्शन मिळण्याकरीता वेबसाईट **http://mahatenders.gov.in** वर संपर्क साधावा.

**निविदेबाबत शंका निरसनार्थ महाराष्ट्र पोर्टल यांना संपर्क साधावा.**

**दुरध्वनी क्रमांक-१८०० ३०७० २२३२**

**भ्रमणध्वनी क्रमांक- +९१-७८७८००७९७२ व +९१-७८७८००७९७३.**

**कार्यकारी अभियंता [सी-३ विभाग],**
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.